स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● सोमवार, दिनांक २३ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५८ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# तारकेश्वर गडाच्या महंतांनी स्वत :चे गुप्तांग कापले ! सात दिवसांनी स्वत :च जनेंद्रियाचा त्याग केल्याचा केला दावा !!

महाराष्ट्रात संत महंत आणि धार्मिक गुरूंना अत्यंत मानाचे स्थान असल्यामुळे या प्रकाराने महाराष्ट्राच्या धार्मिक शास्त्रात मोठी खळबळ

सायंकाळी साडेपाच वाजता भक्तांना सोडून ते आपल्या खोलीत निघून गेले, त्यानंतर तिथे त्यांनी स्वत :च्या अंगावर वार करून घेतले !!

मी स्वत :च माझ्या जनेंद्रियाचा त्याग केला. मला कोणाचाही त्रास नव्हता. माझी प्रकृती स्थिर असून लवकरच गडावर परत येणार !!

## पाथर्डी तालुक्यासह बीड जिल्ह्यात आदिनाथ महाराजांना मानणारा मोठा वर्ग !

**बीड : प्रतिनिधी**

अहिल्यानगरच्या तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी स्वत :चे गुप्तांग कापल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यांनी स्वत :च याची पुष्टी केली आहे. सध्या माझी प्रकृती स्थिर असून मी लवकरच गडावर परत येईल, असेही ते म्हणालेत. महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांना गत रविवारी अचानक तातडीने रुग्णात दाखल करण्यात आले होते ते रक्त बंबाळ अवस्थेत होते. त्यांची ही स्थिती का झाली? हे कोणाच्याही लक्षात येत नव्हते. रुग्णालय डॉक्टरने त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांनी आत्महत्याचा प्रयत्न केला का? अशी चर्चा जनसामान्यात रंगली होती. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना लोकांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. आता या घटनेला एक आठवडा लोटल्यानंतर स्वत : महाराजांनी आपण जखमी का झालो याचे उपरोक्त कारण सांगितले आहे.



### आदित्यनाथ महाराज काय म्हणाले !

● महंतांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांनी स्वत :च स्वत :च्या गुप्तांगावर शस्त्राने वार केले होते. त्यानंतर ते त्यांच्या खोलीत पडून होते. कुणीतरी आत गेल्यानंतर ते त्यांना रक्तबंबळ अवस्थेत दिसले त्यानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. पोलिसांनी त्यांच्याकडे या घटनेविषयी चौकशी केली असता त्यांनी आपण स्वत :हूनच स्वत :वर वार केल्याचे स्पष्ट केले. मी स्वत :च माझ्या जनेंद्रियाचा त्याग केला. मला कोणाचाही काहीही त्रास नव्हता. सध्या माझी प्रकृती स्थिर आहे, मी लवकरच गडावर परत येईल, असे ते म्हणाले.

### महाराजांवर कोणाचा दबाव?

● महाराष्ट्रात संत महंत आणि धार्मिक गुरूंना अत्यंत मानाचे स्थान आहे. त्यामुळे या प्रकारामुळे महाराष्ट्राच्या धार्मिक शास्त्रात मोठी खळबळ उडाली आहे. माणसांनी या प्रकरणी खुलासा केला असला तरी याप्रकरणी अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत त्यामुळे आदिनाथ महाराजांवर काही दबाव होता का त्यांनी कोणाच्या दबावाखाली बळी पडून स्वत :ची गुप्तांग कापले का असे नाना प्रश्न याप्रकरणी उपस्थित होत आहेत

### तारकेश्वर गडावर नेमके काय घडले?

तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री १५ मार्च रोजी सकाळी आपल्या भक्तांसोबत गडावर की बसले होते त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजता भक्तांना सोडून ते आपल्या खोलीत निघून गेले त्यानंतर तिथे त्यांनी स्वत :च्या अंगावर वार करून घेतले त्यानंतर त्यांनी तातडीने रोडला दाखल करण्यात आले. अहिल्यानगरच्या पाथर्डी तालुक्यासह बीड जिल्ह्यात आदिनाथ महाराजांना मानणारा एक मोठा वर्ग आहे त्यामुळे या घटनेमुळे एकच खळबळ माझे आहे.

## भारतीय जीवन बीमा पॉलिसीचा पाच लाखांचा धनादेश पीडित कुटुंबीयांना सुपूर्द

**परळी : प्रतिनिधी**

गर्देवाडी पो. मोहा ता. परळी वै. जि. बीड येथील पवार कुटुंबीयांनी मागच्या दीड वर्षांपूर्वी भारतीय जीवन बीमा कंपनीचे पॉलिसी घेतली होती. पण पॉलिसी घेतल्याच्या नंतर 1 वर्षाच्या आतच दुर्दैवी निधन झाले असता त्यांचा मृत्यू क्लेमची रक्कम भारतीय जीवन विमा निगम कंपनीकडून त्यांच्या कुटुंबीयांना 314100 व 2 लाख रुपये असे 5 लाखाच्या पुढे धनादेश सुपूर्द करण्यात आला.




विमा कंपनीचे अधिकारी गिरी, बिरेवाडी, पवार तसेच विमा प्रतिनिधी बाळू राठोड सर यांनी त्यांच्या प्रयत्नातून विमा क्लेम मिळवून दिला. व सर्व जनतेस एलआयसी पॉलीसी घेण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

## प्रशासन व ग्राहकांचीकोंडी करण्यासाठी विनय इण्डेन चा पुढाकार; ऑफिसचे फोन बंद केल्याने नागरिकांची गर्दी व टेन्शन वाढले

**गॅसचा प्रचंड तुटवडा असल्याचे चित्र इण्डेन ने निर्माण केले, ऑफिस बॉय व कर्मचाऱ्यांनी ऑफिस घेतले ताब्यात**

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

देशभरात गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, या परिस्थितीत नागरिकांना दुहेरी फटका बसत असल्याचे चित्र आहे. एकीकडे सिलेंडरसाठी ग्राहकांना दिवसन्दिवस एजन्सीच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत, तर दुसरीकडे सीडको, बळीराम पाटील शाळेजवळ असलेल्या इण्डेन गॅस एजन्सीने ऑफिसची सर्व फोन सेवा बंद करून ग्राहकांचे टेन्शन वाढवले. फोन करून करून थकल्यानंतर नागरिक दुकानावर चकरा मारत आहेत. येथील काहीजण अशा नागरिकांना बाजूला घेऊन जादा दरात गॅस सिलिंडर विक्री करत अल्याच्या तक्रारी आहेत.



केवळ याच कारणामुळे गॅस एजन्सीने आपले फोन व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. काही जणांना १३ तारखेला बुकींग करून त्यांची ऐनवेळी बुकींग केली नसल्याचे सांगत आहेत. काहींना गॅस बुकींग केल्याचा मॅसेज येऊनही त्यांना दहा दिवस गॅस मिळत नाही आणि नेमके गॅस कधी येणार आहे हे विचारण्यासाठीऑफिसला फोन केल्यानंतर ऑफिसने सर्व नंबर व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. वारंवार मोबाईल करून चौकशी करणाऱ्या ग्राहकांचे नंबर ब्लॉक करण्यात आले आहेत. नागरिकांनी या एजन्सीला मेल टाकून तक्रार केल्यानंतर मेल चे एकदा उत्तर दिल्यानंतर पुन्हा गॅस दिला जात नाही अशा तक्रारी असून तात्काळ या एजन्सीवर कार्यवाही करण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे. हे ऑफिस एजन्सी मालकाने ऑफिस बॉय व कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सोडल्याने ग्राहकांत संभ्रम निर्माण होत आहे.

**स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी !** ‘गोट्या खेळत’ लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

## जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय ?

५० लाखांची जाहिरातींची देयके रखडवणा-या जिल्हा प्रशासनाच्या निषेधार्थ! जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

**बीड / प्रतिनिधी :**

एकीकडे शासन पारदर्शकतेचे दावे करत असताना, बीड जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा मात्र स्थानिक वृत्तपत्रांच्या जाहिरातींची बिले अडवून त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाकडून होत असुन गळचेपी करत आहे .जिल्ह्यातील विविध भूसंपादन कार्यालयांमार्फत देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके तब्बल १० वर्षांपासून प्रलंबित असल्याने संताप व्यक्त होत आहे.





या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.२३, सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे ‘गोट्या खेळत’ लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. “जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय?” असा सवाल करत प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला. दफ्तर दिरंगाई करणा–या आधिका–यांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाईची मागणी करण्यात आली .यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन सादर करण्यात आले.

**प्रकरण नेमके काय? :**

बीड जिल्ह्यातील विविध शासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कायदेशीर जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केल्या जातात. मात्र या जाहिरातींचे पैसे वेळेत न दिल्याने मोठा निधी अडकून पडला आहे.

● पान २ वर...

## मुस्लिम ओबीसी चळवळीतील आधारस्तंभ निखळला - ॲड. सुभाष राऊत

**ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर भाई अन्सारी यांना समता परिषदेची भावपूर्ण श्रद्धांजली**

**बीड / प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुस्लिम ओबीसी चळवळीचे जनक, मंडल योद्धा शब्बीर अन्सारी साहेब आज आपल्यात नाहीत, ही अत्यंत दु :खद आणि मनाला चटका लावणारी बातमी आहे. त्यांच्या जाण्याने मुस्लिम ओबीसी चळवळीतील आधारस्तंभ निखळला असल्याचे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे.



ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर भाई अन्सारी यांना समता परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ॲड. सुभाष राऊत बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, काही दिवसापूर्वी मुंबईत त्यांची

● पान २ वर...

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल.

## आधारस्तंभ निखळला - ॲड. सुभाष राऊत

● पान १ वरून . . . प्रकृती ठीक नसल्याच्या वृत्तानंतर त्यांची विशेष भेट घेतली होती. ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी तब्बल ४५ वर्षांहून अधिक काळ सामाजिक न्यायाच्या लढाईत आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. १९९० मध्ये पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी जाहीर केल्यानंतर, मुस्लिम ओबीसींना त्यांच्या घटनात्मक अधिकारांसाठी जागं करण्याचं आणि त्यांना संघटित करण्याचं मोठं कार्य शब्बीर भाईंनी केलं. त्या काळात मुस्लिम समाजात ओबीसी जागृतीची कोणतीही दिशा नव्हती, पण त्यांनीच ती दिशा दिली. राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब, गोपीनाथराव मुंडे साहेब आणि ओबीसी नेते ॲड. जनार्दन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी उभी केलेली चळवळ आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी तुमच्यासारखे युवक प्रामाणिकपणे चळवळीत काम करत आहेत, प्रस्थापितांविरुद्ध लढत आहेत, हे पाहून चांगलं वाटतं असे म्हणाले. त्यांनी छगनराव भुजबळ साहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त करत सांगितले की, भुजबळ साहेबांमुळे मी वाचलो. माझी प्रकृती बिघडल्याचं समजताच ते स्वत: टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये आले. दोन तास थांबून त्यांनी माझ्या उपचारासाठी सर्वांना सक्त ताकीद दिली. भुजबळ साहेबांसारखा सहकाऱ्यावर प्रेम करणारा नेता नाही. आज जेव्हा ओबीसी आरक्षणावर संकट आहे आणि मराठा आरक्षणाच्या नावाखाली सामाजिक ध्रुवीकरण होत आहे, तेव्हा त्यांच्या डोळ्यातील अस्वस्थता स्पष्ट दिसत होती. ते म्हणाले की, लढणारे नेतृत्व निर्माणच झाले पाहिजे तुमच्यासारखे शेकडो कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत. तसं झालं असतं, तर ४३ वर्षांनंतर मिळालेले आरक्षण धोक्यात आले नसते. बिहार–उत्तर प्रदेशात राममनोहर लोहिया यांच्या "पिछड़ा पावे सौ में साठ" या घोषणेतून प्रेरित होऊन ओबीसी नेतृत्व उभं राहिलं, मात्र महाराष्ट्रात मागासवर्गीय नेतृत्वाची कमतरता त्यांना कायम खंतावत होती. त्यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाला 'मंडल नामा' या पुस्तकातून शब्दबद्ध केलं. पण त्यांच्या चेहऱ्यावर शेवटपर्यंत एकच वेदना होती, माझं काम अपुरं राहिलं ही वेदना केवळ त्यांची नव्हे, तर संपूर्ण ओबीसी समाजाची आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत देत ६ व्या केमोथेरपीनंतर त्यानी अखेरचा श्वास घेतला आणि ओबीसी चळवळीचा एक अटल, निडर योद्धा आपल्यातून निघून गेला. आज आपण एक दूरदर्शी नेता, निस्वार्थी समाजसेवक आणि चळवळीला दिशा देणारा दीप गमावला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. त्यांनी सुरू केलेला लढा पुढे नेणं, हेच आपलं कर्तव्य आणि त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

यावेळी समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक नितीन साखरे, शहराध्यक्ष नितीन राऊत, नगरसेवक भारत कांबळे, विष्णू यादव, नवनाथ दोडके, जयंती महोत्सव समितीचे माजी अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी स्वप्नील शिंदे, उपाध्यक्षपदी आदित्य शिंदे, सचिव शरद विटकर, कोषाध्यक्ष महेश व्यवहारे, सहसचिव निखिल भालेराव, सहकोशाध्यक्ष रोहित जमदाडे, सिद्धू गायकवाड, धनगर समाजाचे युवा नेते रणजीत सोन्नर, नाभिक समाजाचे युवा नेते तुषार दोडके, मंगेश जमदाडे, मकरंद काळे, रामेश्वर राऊत, वैभव गोरे, माहेश चौधरे, कुणाल व्हावळ, बापू उजगिरे, सवरव परळकर, प्रेम काकडे, स्वप्नील कचरे, रोहित वडमरे, निखिल भालेराव, शेखर बनसोडे, कार्तिक गनगे, अमोल वाघमारे, पवन राऊत, वेंकटेश राऊत, अजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, अजय शिंदे, राकेश लांडगे, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शिवम यादव, राकेश धांवे, निखिल मेटे, संदीप सोनवणे, अतुल वरपे, नितीन भोजने, भोलानाथ गुंजाळ यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक आणि फुले प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय?

● पान १ वरून . . . विशेष म्हणजे, सन २०२१ ते २०२४ दरम्यान भूसंपादन कार्यालयाकडून मंत्रालयाकडे पाठवलेल्या प्रस्तावांमध्ये तांत्रिक त्रुटी निदर्शनास आणून ते प्रस्ताव परत पाठवण्यात आले. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी त्या त्रुटी दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्याबाबत उदासीनता दाखवली. परिणामी गेल्या ३–४ वर्षांपासून प्रस्ताव प्रलंबित आहेत.

**वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी :**

प्रलंबित देयकांमुळे स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलने करूनही केवळ आश्वासने मिळाली; प्रत्यक्ष निधी मात्र मिळालेला नाही. त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रावरच आर्थिक संकट ओढवल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

**आंदोलनात सहभागी :**

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर, सुदाम तांदळे, मुबीन शेख, पांडुरंग हराळेतसेच बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती–भिमशक्ती विचारमंच), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी – बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, किष्किंधा पांचाळ ( अध्यक्ष विश्वकल्याण सेवा भावी संस्था बीड)आदी सहभागी झाले होते.

**प्रमुख मागण्या :**

➤ प्रलंबित ५० लाख रुपयांची देयके तातडीने मंजूर करावीत
➤ मंत्रालयाने दाखवलेल्या तांत्रिक त्रुटी त्वरित दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करावेत ➤ संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी
➤ स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक पिळवणूक थांबवावी





# "मोगरा फुलला" भावगीतांच्या सुरांनी दरवळली अविस्मरणीय संध्या

छत्रपती संभाजीनगर : सिंग अलॉंग कराओके क्लासेस तर्फे आयोजित "मोगरा फुलला" हा भावगीतांचा सुरेल कार्यक्रम महसूल प्रबोधिनीच्या सभागृहात अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. सुरेल गीतांचा गंध, निवेदनाची हळुवार साथ आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण भावनांनी आणि आठवणींनी दरवळून गेले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि "दिव्य मराठी"चे स्टेट हेड श्री. सुभाष बोंद्रे, प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगक्षेत्रातील मान्यवर श्री. रामकांत पुलकुंडवार तसेच कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह बँकेचे जनरल मॅनेजर श्री. अविनाश चव्हाण यांची उपस्थिती लाभली. याचबरोबर, विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख आदरणीय जयंत शेवतेकर यांचीही विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यानंतर जया महाजन मॅडम यांच्या सुमधुर आवाजातील "मोगरा फुलला" या भावगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्या सुरेल आरंभाने संपूर्ण वातावरण प्रसन्न व गंधमय झाले.

या कार्यक्रमात विविध नामवंत गायक कलाकारांनी आपल्या सुरांनी श्रोत्यांची मने जिंकली. यामध्ये रवी पवार, सुनिल जोगदंड, प्रशांत मुळे, गिरीश देशपांडे, भारती तेरकर, सीमा खडतकर, आरती वडोदकर, सविता परदेशी, शिरीष देशमुख, शिवाजी काकडे, रत्ना जैस्वाल, संगीता धकाते, अनिल कोथळकर, स्वाती धोंड, पूजा हाटकर, डॉ. संध्या मोहिते, किरण शर्मा, धीरेन पारेख, प्रदीप ब्रम्हपूरकर, सोम पिसोळे, डॉ. मृणालिनी प्रभाकर, शारदा पाटील, उषा रोडे, निलेश शाह, वृषाली गायकवाड, विवेक जोशी आणि विभा जोशी या कलाकारांचा समावेश होता.

प्रत्येक कलाकाराने सादर केलेल्या गीतांमधून भावगीतांचा गोडवा, हळवेपणा आणि शब्दांची सुंदरता खुलून आली. "धुंदी कळ्या", "हे चिंचेचे झाड", फुलले रे क्षण माझे, शुक्रतारा मंद वारा, शारद सुंदर चंदेरी राती, लाजून हासणे, फिटे अंधाराचे जाळे, अधीर मन झाले, गारवा यांसारख्या गीतांनी रसिकांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. कार्यक्रम यशस्वितेसाठी संतोष महाजन यांनी महत्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संध्या मोहिते यांनी अत्यंत प्रभावी आणि भावपूर्ण शैलीत केले. त्यांच्या निवेदनामुळे प्रत्येक गाण्याला एक वेगळीच भावछटा प्राप्त झाली आणि कार्यक्रम अधिक रंगतदार बनला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कलाकारांचे कौतुक करत, अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात सहभागी सर्व कलाकारांनी आपल्या कलेतून उपस्थितांना एक अविस्मरणीय अनुभव दिला. शेवटी सर्व मान्यवर, कलाकार आणि उपस्थित रसिक यांचे आभार मानण्यात आले.

"मोगरा फुलला" या कार्यक्रमाने संगीत, शब्द आणि भावना यांचा सुंदर संगम साधत, उपस्थितांच्या मनात सुगंधी आठवणींची फुले उमलवली.




विशेष
**डॉ. संध्या मोहिते**
सूत्रसंचालन, लेखिका, कवयित्री


# भोंदूगिरी, सत्तेची छाया आणि सत्य दडपण्याचा खेळ :
# अशोक खरात प्रकरणातून उघड होणारे भयावह वास्तव

आजच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांचा शासनावर असलेला विश्वास हा सर्वात मोठा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जेव्हा सत्ताधारीच त्या विश्वासाला तडा देणाऱ्या घटनांमध्ये गुंतलेले दिसतात, तेव्हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेवर उभा ठाकतो. भोंदू अशोक खरात प्रकरणाने सध्या राज्याच्या राजकारणात अशीच खळबळ उडवली आहे. या प्रकरणात अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने ते दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे, आणि हीच बाब अधिक गंभीर आहे. अशोक खरात नावाचा एक तथाकथित "गुरु" किंवा "बाबा" आपल्या चमत्कारांच्या, अंधश्रद्धेच्या आणि मानसिक प्रभावाच्या जाळ्यात अनेकांना अडकवत होता, हे आता उघड झाले आहे. मात्र, या भोंदूगिरीमागे केवळ एक व्यक्ती नसून, त्याला मिळालेली राजकीय पाठराखण ही अधिक धक्कादायक आहे. समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, अधिकारी आणि राजकीय नेते यांचे त्याच्याशी असलेले संबंध हळूहळू समोर येत आहेत आणि इथेच प्रश्न निर्माण होतो. जर सत्तेतील लोकच अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?

या प्रकरणात सर्वात धोकादायक बाब म्हणजे, सत्य बाहेर येऊ नये म्हणून चाललेले प्रयत्न. तपास यंत्रणांवर दबाव, पुरावे दडपण्याचा प्रयत्न, साक्षीदारांना धमकावणे, हे सगळे चित्र लोकशाहीला कलंक लावणारे आहे. जेव्हा "अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याची भीती" ही चर्चा पुढे येते, तेव्हा हे स्पष्ट होते की हा केवळ एक गुन्हा नसून, सत्तेच्या उच्च पातळीवर पोहोचलेला भ्रष्टाचाराचा जाळ आहे. वृत्तपत्रांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्याच परंपरेत या प्रकरणाकडे पाहिले, तर ही घटना केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नाही, तर सामाजिक आणि राजकीय अध:पतनाचे प्रतीक आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कायदे असतानाही, अशा व्यक्तींना राजकीय आश्रय मिळतो, ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू–फुले–आंबेडकरांच्या विचारांपर्यंत, या भूमीने नेहमीच विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला आहे. मग आज त्याच महाराष्ट्रात भोंदूगिरीला इतकी मोकळीक कशी मिळते? याचे उत्तर शोधताना आपण सत्तेच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही.




अशोक खरातसारख्या व्यक्तींना फोफावण्यासाठी केवळ लोकांची अंधश्रद्धा कारणीभूत नसते; त्यामागे सत्तेचा आशीर्वाद असतो. जेव्हा मंत्री, आमदार किंवा प्रभावशाली नेते अशा व्यक्तींच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात, त्यांचे गौरव करतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो की, ही व्यक्ती खरोखरच प्रभावशाली आहे आणि मग सामान्य माणूसही त्या प्रभावाला बळी पडतो. या प्रकरणात जर खरोखरच मंत्रिमंडळातील काही सदस्य अडकत असतील, तर तपास अधिक पारदर्शक आणि कठोर होणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने, सध्या दिसणारी परिस्थिती उलट आहे. प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चा म्हणजे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण, जर सत्ताधारीच स्वत:ला वाचवण्यासाठी तपासात हस्तक्षेप करत असतील, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. यापूर्वीही देशात अनेक घोटाळे, प्रकरणे समोर आली आहेत, जिथे सुरुवातीला सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला पण शेवटी सत्य बाहेर आलेच. कारण सत्याला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते कधी ना कधी उघड होतेच. अशोक खरात प्रकरणातही हेच होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी समाजाची जागरूकता आणि माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.




विशेष
**प्रवीण बागडे**
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९


आजच्या डिजिटल युगात माहिती लपवणे इतके सोपे राहिलेले नाही. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता आणि जनतेची सतर्कता यामुळे अनेक गोष्टी उघडकीस येतात पण याचबरोबर खोटी माहिती पसरवण्याचाही धोका असतो. त्यामुळे या प्रकरणात सत्य आणि अफवा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे. तरीही, जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे अंधश्रद्धेविरोधातील लढा. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक वर्षे कार्य झाले आहे पण तरीही अशा भोंदूंचा प्रभाव टिकून आहे, याचा अर्थ अजूनही समाजात जागृतीची गरज आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हे प्रकरण सत्ताधाऱ्यांसाठी एक मोठी कसोटी आहे. जर त्यांनी पारदर्शक आणि निष्पक्ष तपासाला सहकार्य केले, तर त्यांचा विश्वास टिकू शकतो. पण जर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, तर जनतेचा रोष अधिक वाढेल. कारण आजचा मतदार जागरूक आहे, प्रश्न विचारतो आणि चुकीच्या गोष्टींना माफ करत नाही. विरोधकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी या प्रकरणाचा केवळ राजकीय फायदा घेण्याऐवजी, सत्य बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ सत्तेचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा आहे.

शेवटी, या प्रकरणाकडे केवळ एक घोटाळा म्हणून न पाहता, एक मोठा सामाजिक संदेश म्हणून पाहणे गरजेचे आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. कारण जर आपण आज आवाज उठवला नाही, तर उद्या अशा घटना आणखी वाढतील. अशोक खरात प्रकरण हे एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या समाजाचे आणि व्यवस्थेचे खरे स्वरूप दाखवत आहे. आता प्रश्न हा आहे की आपण त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाला स्वीकारून बदल घडवणार आहोत का, की पुन्हा एकदा डोळेझाक करून पुढे जाणार आहोत? लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सजगतेत असते आणि आज ती सजगता दाखवण्याची वेळ आली आहे. सत्य दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न हा लोकशाहीवर आघात असतो. त्यामुळे या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भीड तपास होणे हीच काळाची गरज आहे


सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



# इफ्तार पार्टीच्या माध्यमातून 'डायटोरा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' तर्फे सकारात्मकतेचा संदेश

➤ **छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

डायटोरा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत इफ्तार पार्टीचे आयोजन डायटोराचे एमडी श्री सुमित पाटणी यांनी केले मागील चार वर्षात एलईडी आणि वॉशिंग मशीन या इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे पाटणी यांनी सर्व धर्म समभाव या संकल्पनेतून कंपनीतील कर्मचाऱ्यांना इतर नागरिकांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले यावेळी कंपनीचे सेल्स मॅनेजर श्री किरण अजमेरा, सर्विस हेड सुरज कुलकर्णी, सर्विस मॅनेजर गणेश ढगे, डिस्पॅच डिपार्टमेंटचे मॅनेजर गौरव पाटणी, अल्ताफ शेख व इतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते पाटणी सर यांनी सर्वांना रमजान ईद च्या शुभेच्छा देत अशा प्रकारचा उपक्रम सर्वांनी करावा असे आवाहन केले

# केंद्रीय नवोदय परिक्षेत आरूश यशवंत राऊत ने ९९ टक्के मार्क मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक



आष्टी / प्रतिनिधी :

आष्टी तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात तब्बल चार पिढ्या नामदेव राऊत यांच्या कुटुंबांचे नाव मोठया आदराने घेतले जाते, या सामाजिक कार्याची पावती त्यांना सामाजाने आशिर्वाद आज त्यांच्या नातवाला मिळाली आसे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही.

आष्टी तालुक्यातील प्रथम सरपंच नामदेव राऊत यांचे नातू चि. आरूश यशवंत राऊत या चिमूकल्या विद्यार्थी नुकत्याच पार पडलेल्या केंद्रीय नवोदय परिक्षेत घवघवीत यश संपादन केले, या परिक्षेत तब्बल ९९ टक्के मार्क प्राप्त केले या यशाबद्दल आरूशचे आष्टी तालुक्यातील शिक्षकबांधव व शिक्षकप्रेमींनी आरूशला सुंदर आसा फेटा बांधून, जंगी स्वागत केले

स्वागत करतांना शिक्षकांनी आरूशला डॉ. ए. पी. जी. अब्दुल कलाम यांचे पुस्तक सप्रेम भेट दिले, यावेळी राउत कुटूंबानी सर्वत्र पेढे वाटून चि .आरूशच्या यशाचे कैतूक केले आहे.

यावेळी आदर्श शिक्षक संदीप धोंडे ,पांडुरंग लटपटे, बनकर महाराज, अमोल कदम ,सचिन कदम ,जिरेकर सर, गोकुळ अनारसे ,राजेंद्र हजारे, प्रवीण धोंडे ,अनिल शेंबडे ,गणेश नन्नवरे, महादेव गीते ,राजेंद्र खेडकर, मुकेश शिंदे ,सतीश जाधव ,शिवाजी घोडके व आदी शिक्षक बांधव यांनी उपस्थित राहून आरूश याचे स्वागत केले आहे. चि .आरूश हा आष्टी शहरातील वसुंधरा शाळेचा विद्यार्थी आहे,हे यश संपादन करण्यासाठी शाळेच्या शिक्षीका मार्गदर्शक गांगर्डे मॅडम , व वसुंधरा प्राथमिक शाळेचे संस्थापक अध्यक्ष मनोरंजन धस यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

# श्री क्षेत्र पुंडी येथे ह.भ.प. जनार्दन दास महाराज यांच्या संगीत तुलसी रामायण कथेचा भव्य आयोजन

➤ **पुंडी (ता. आष्टी) / प्रतिनिधी :** श्रीराम नवमी निमित्त श्री क्षेत्र पुंडी वाहिरा येथे दिनांक १९ मार्च ते २७ मार्च या दरम्यान ह.भ.प. जनार्दन दास महाराज (आळंदी देवाची) यांच्या भव्य दिव्य संगीत तुलसी रामायण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २२ मार्च २०२६ रोजी चौथ्या दिवशी तुलसी रामकथेत प्रभू रामचंद्र यांचा जन्म झाला. यावेळी कार्यक्रमाला ह.भ.प. अमोल महाराज सातपुते, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख, समाजसेवक समीर शेख, सरपंच प्रतिभा थोरवे, ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, उपसरपंच बाळासाहेब देवा थोरवे, ह.भ.प. सतीश दळवी महाराज, अनिल गलांडे, बोडखे सर पुंडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील संगीत अलंकार रामायणाचार्य ह.भ.प. जनार्दन दास महाराज हे श्रीराम कथा सादर करीत आहेत. श्रीरामायण कथेसाठी सिंथ वादक म्हणून योगेश महाराज सासणिक (अकोला) तर तबला साथ आदिनाथ वाडेकर आणि पॅड वादक म्हणून अजित महाराज पवार साथसंगत करीत आहेत.

तुलसी रामायण कथेचे हे तिसरे वर्ष असून कथाभागात तुलसीदास महाराज चरित्र, शिव पार्वती विवाह, पुत्रकामेष्टी यज्ञ, श्रीराम जन्म, बाललीला, विश्वामित्र यज्ञ रक्षण, अहिल्या उद्धार, धनुष्यभंग, सीता राम विवाह, अयोध्यानंद उत्सव, मंथरा बुद्धिभ्रंश, श्रीराम वनगमन, गुहक भेट, निषादराज भेट, केवट संवाद, पंचवटी, सीताहरण, शबरी भेट, सुग्रीव मैत्री, हनुमंतांकडून सीता शोध, लंकादहन, राम रावण युद्ध, अयोध्येत राज्याभिषेक इत्यादी प्रसंग श्रोत्यांना श्रवण करता येणार आहेत.

याकरिता उत्तम झाकी दर्शन बुधवंत महाराज यांचे असून ध्वनीसंयोजन रवी जाधव (आर के साऊंड, अहिल्यानगर) करीत आहेत. श्रीराम जन्माचे कीर्तन दिनांक २६ रोजी सकाळी दहा ते बारा या काळात ह.भ.प. सतीश महाराज दळवी यांचे होणार असून दिनांक २७ रोजी अभंग सारस्वत भागवताचार्य आदिनाथ महाराज दानवे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. गायनाचार्य म्हणून ह.भ.प. संपत दानवे, ह.भ.प. अनिल गरुड, देविदास आमटे तर मृदुंगाचार्य मयूर महाडिक (आळंदी) व बळीराम वाडेकर साथ करीत आहेत.



हभप जनार्दनदास महाराज (आळंदी देवाची)

दिनांक २७ रोजी शुक्रवारी सायंकाळी सहा ते दहा या वेळेत शंभू सूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्था (जामखेड) यांचे शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादरीकरण होणार आहे. हा ऐतिहासिक प्रसंग रंगणार आहे.

रामनवमी निमित्त उपवास प्रसाद पंगत श्री बबनराव बापूराव भालेराव (फौजी) आणि सोन्याबापू नवसुपे (कंडक्टर) यांच्यावतीने होणार आहे. दिनांक २७ रोजी काल्याच्या कीर्तनानंतरची महाप्रसाद पंगत सचिन थोरवे, विशाल जाधव, राम भागवत आणि महेश धुमाळ यांच्या वतीने असणार आहे.

संगीत तुलसी रामायण कथा व त्यानिमित्ताने श्रीराम जप, संगीत भजन, कीर्तन आदी श्रवणाचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच प्रतिभा थोरवे, ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, उपसरपंच बाळासाहेब देवा थोरवे, अनिल गलांडे, दत्तोबा गलांडे, लहानु ढगे, सुशील जाधव, अजय थोरवे, आजीनाथ भालेराव, तुषार रामगुडे, सागर ढगे, संजय थोरवे, दत्ता थोरवे, महेश वाडेकर, प्रदीप थोरवे, संजय जाधव, नवनाथ भालेराव, संदीप जगदाळे, शांतीलाल भालेराव, अतुल नवसुपे, दत्ता सुरवसे, घनश्याम भालेराव, सत्यवान पगारे, दत्ता थोरवे, देवराव थोरवे, रविकाका आणि समस्त पुंडी ग्रामस्थांनी केले आहे.

पंचक्रोशीतील धानोरा, पुंडी, पिंपळगाव, खुंटेफळ, साबलखेड, वाहिरा, कुंबेफळ, बाळेवाडी, पारोडी, सोलापूरवाडी, चिंचोली, कडा आदी भागातील श्रीराम भक्त, भाविक नागरिकांनी श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ पुंडी यांनी केले आहे.

# नागरिक, विद्यार्थ्यांसाठी सावंगी हर्सूल येथील रस्ता ओलांडणे ठरतेय जीवघेणी कसरत

## ➤ गतिरोधक व फलक बसवण्याच्या मागणीला प्रशासनाकडून ठेंगा

**प्रशासन मोठ्या अपघाताच्या प्रतिक्षेत**











➤ **छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

सावंगी हर्सूल येथील नव्याने झालेली मोठ मोठी रस्ते शाळकरी मुलांना जीवघेणी ठरत आहेत. विकास विकास म्हणून गप्पा मारणाऱ्या अधिकारी व लोकप्रतिनिधींना अर्ज व निवेदने देऊनही साधे गतीरोधक बसवण्याचे कामही हाती घेतले जात नसल्यामुळे मुलांनी नव्या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद शाळेतून मुलांना काढून इतर शाळेत टाकण्याचा निर्णय घेतला आहेत. मात्र अजूनही प्रशासन नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्षच करत आहे.


सावंगी हर्सूल येथील रस्ता ओलांडणे अत्यंत धोकादायक झाले आहे. सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांसमोर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठी तारेवरची जीवघेणी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी रस्ता ओलांडताना अनेक अपघातही झाले आहेत. काहींना तर आपला जीव गमवावा लागला आहे. रस्ता ओलांडतांना मधील गॅपमध्ये जागा अपुरी असल्याने हा धोका जास्त वाढला आहे. या ठिकाणी दुचाकी वाहनांनाही रस्ता ओलांडणे कठीण जाते. कारण दोन्ही रस्त्याच्या मधील भागाचे अंतर कमी असल्याने दुचाकी रस्त्यांच्या दोन्ही बाजूने आलेली असते त्यामुळे अपघात होण्याचा धोका अधिक आहे.

विद्यार्थ्यांसाठी रस्ता ओलांडण्यासाठी महानगरपालिकेने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

सावंगी हर्सूल हा परिसर गेल्या दहा–बारा वर्षांपासूनच गजबजलेला आहे. या मार्गांवरून शहरातील व जळगाव, सिल्लोड, बीड, पंढरपुर, कोल्हापूर, तुळजापूर, छत्रपती संभाजीनगर या शहराकडे, कडे जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. रस्ते मोठे झाल्याने झाल्याने यामार्गावरून वाहतूक करणारी वाहने मोठ्या प्रमाणावर वाढली. दुचाकी, चारचाकी, जड वाहने यांचे प्रमाण हळूहळू वाढू लागले. अक्षरश: रस्ताही अपुरा पडू लागला. रस्ता मोठा होत गेला तशी वाहतूकही वाढली.

या रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडवायची असेल, तर या मार्गावर दोन्ही बाजूने गतीरोधक व मार्गदर्शक रेडीयम फलक लावण्याची गरज असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी वर्तविले आहे. गतिरोधकाच्या मागणीकडे दुर्लक्ष करून प्रशासन मात्र मोठ्या अपघाताच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसत आहे.

# महा जम्बो शब्दकोडे



**आडवी विधाने**

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

**उभी विधाने**

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

**महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष



## दिंद्रुडचा अजिंक्य अमोल ठोंबरे नवोदय पुर्वपात्र परीक्षेत जिल्ह्यात चौथा

➤ माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील दिंद्रुड येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल बालासाहेब ठोंबरे यांचा चिरंजीव अजिंक्य हा नवोदयच्या इयत्ता ६ वी पुर्वपात्र परीक्षेत पात्र झाला आहे . त्याने बीड जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवून गावचे व शाळेचे नाव उज्वल केले आहे . नवोदयच्या पुढील शिक्षणासाठी तो पात्र ठरला असून अजिंक्यचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे . जिल्ह्यात पात्र झालेल्या 80 विद्यार्थ्यांपैकी दिंद्रुड येथील सर्वाधिक १२ विद्यार्थी नवोदयासाठी पात्र झाले आहेत .

दिंद्रुड येथील चार शाळेचे एकुण १२ विद्यार्थी नवोदय परीक्षेत उत्तीर्ण होत गढी येथील पीएम श्री नवोदय विद्यालयात पुढील शिक्षणासाठी पात्र ठरले आहेत . यामध्ये पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांचे सुपुत्र अजिंक्य ठोंबरे याने नवोदय परीक्षेत भरघोस यश मिळवून मोठे यश संपादन केले आहे . त्याने जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला आहे . अजिंक्यने आतापर्यंत मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत सलग दोन वर्षे माजलगाव तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवलेला आहे .या यशाबद्दल अजिंक्य याचे दिंद्रुड येथील विविध शाळा, बाजारपेठ, विविध संस्था व व्यापाऱ्यांनी यथोचित सन्मान करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या .

## पैठण तालुका पावती मुक्त महात्मा फुले व डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी किरण घाटवीसावे

### कार्याध्यक्षपदी योगेश (बंटी) धूपे, आदर्श दळवी यांची निवड

➤ पैठण/ प्रतिनिधी :

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले तसेच विश्वरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त पावती मुक्त तालुका सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी किरण रमेश घाटविसावे तर कार्याध्यक्षपदी योगेश ( बंटी ) धूपे, आदर्श दळवी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली .
पैठण शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये शहरातील राजकीय, सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत व अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या बैठकीत याही वर्षी सालाबादप्रमाणे क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती पावती मुक्त जयंती साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला . व सर्वानुमते खालील प्रमाणे पैठण तालुका जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली .अध्यक्ष किरण घाटविसावे,उपाध्यक्ष मनीष आठवले, रंजित तुपे, चैतन्य बनकर, तसेच कार्याध्यक्ष योगेश ( बंटी ) घुपे, आदर्श दळवी, सचिवपदी शुभम पहीलवान, गणेश अवसरमल, हर्ष बनसोडे, स्वप्निल सातदीवे, सहसचिव सुरेश ( सोनू ) कोल्हे, प्रीतम आडसुळ,आकाश आडसुळ ,शंकर नवगीरे तर कोषाध्यक्ष विनोद पोटफोडे,अविनाश ससाने, सोमनाथ आडसुळ,आनंद साळवे, कोषाध्यक्ष सुदर्शन चाबुकस्वार, महेंद्र वाव्हळे, आनंद बनकर,मनोज ससाने तसेच स्वागताध्यक्षपदी किरण मगरे व रितेश पहिलवान यांच्या सह सोशल मीडिया विभागाची जबाबदारी यश मगरे, ऋषी पाचणकर,विवेक खंडागळे,कृष्णा पहिलवान, कृष्णा खांडे, ऋषिकेश घाटविसावे,दत्ता संजय पहिलवान यांची निवड करण्यात आली .यावेळी जयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष सुमित मगरे,माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, नगरसेवक गौरव आठवले,अरुण बल्हाळ, भारत आठवले, अशोक पगारे, गौतम बनकर, प्रकाश निकाळजे, स्वप्निल साळवे, कपिल पहिलवान यांच्यासह इतरांची उपस्थिती होती .

## साने गुरुजी विद्यालयात पॅड वाटपातून आरोग्य जनजागृती'




➤ कन्नड / प्रतिनिधी :

शहरातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती व ऑरगॅनिक सॅनिटरी पॅड वितरणाचा उपक्रम उत्साहात पार पडला . या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये आरोग्य जागरूकता वाढवून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले .

विश्व उद्यम सहाय्यता फाउंडेशनच्या प्रगती तायडे यांच्या पुढाकारातून व धरती संजीवनी फाउंडेशनचे सत्तार खान यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला . 'एक लाख सॅनिटरी पॅड वितरण मोहिमे'अंतर्गत हजारो विद्यार्थिनींना ऑरगॅनिक सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले असून, मासिक पाळीदरम्यान स्वच्छता कशी राखावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले .

कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक व समन्वय माधुरी नारखेड यांनी केले . यावेळी महिला शिक्षिका हर्षदा कदम, अलका जाधव तसेच शाळेच्या व्यवस्थापन मंडळातील मान्यवर उपस्थित होते . या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली . कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक धैर्यशील केरे व क्रीडा शिक्षक राकेश निकम यांनी विशेष परिश्रम घेतले .

ई पेपर वाचा
• सांज दैनिक बीड •
वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; एक जखमी

### रस्ते मोठे झाले त्यासोबत वाहनांचाही वेग वाढल्याने घडताहेत मोठे अपघात

➤ पाचोड / प्रतिनिधी

धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर एचपी पेट्रोल पंपासमोर, अंबड तालुक्यातील भोकरवाडी परिसरात शनिवार ( दि . २१ मार्च ) सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला . अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेत दुचाकीस्वाराचा घटनास्थळी मृत्यू झाला असून दुसरा जण गंभीर जखमी झाला आहे .
मिळालेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील वाकोळणी येथील रहिवासी कल्याण बापूराव कोळकर ( वय ५० ) आणि बप्पासाहेब पराडे ( वय ४५ ) हे दोघे मित्र खासगी कामानिमित्त पाचोड येथे आले होते . काम आटोपून ते दुचाकी ( क्र . एम एच २१ बीपी ६०३४ ) ने आपल्या गावाकडे परतत होते .
भोकरवाडी परिसरातील एचपी पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून रस्त्याकडे वळत असताना समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली .

ही धडक इतकी भीषण होती की कल्याण कोळकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर बप्पासाहेब पराडे हे गंभीर जखमी झाले .
घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन रुग्णवाहिकेच्या मदतीने दोघांना पाचोड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले .

तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ . बाबासाहेब घुगे यांनी तपासणी करून कोळकर यांना मृत घोषित केले . तर जखमी पराडे यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले .
दरम्यान, अपघातानंतर अज्ञात ट्रकचालक वाहनासह फरार झाला असून, उशिरापर्यंत या घटनेची नोंद करण्यात आलेली नव्हती .

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● नव्याने सिमेंटची गुळगुळीत रस्ते केल्यानंतर वाहनांचा वेग वाढला . खेड्यापाड्याकडे जाणारी रस्तेही राष्ट्रीय महामार्गासारखीच वाटू लागली . शहर , गाव पुढे येत असताना कसलेही रेडीयम रिफ्लेक्टर किंवा सूचना फलक आता लावले जात नाहीत . गतीरोधक नाही . त्यामुळे वाहने सुसाट जात असले तरीही आपण सुसाट वेगात जात असताना अनेकांची कुटूंब व त्यावर अवलंबून असलेली माणसच संपवत आहोत हेच कुणाच्या लक्षात येताना दिसत नाही . रस्त्यालगत येणारी शाळा, पेट्रोल पंप, गावखेड्यात असलेले रविवारचे बाजार या ठिकाणी गर्दीची ठिकाणे असतात याचाच मोठ्या वाहनांना विसर पडलेला दिसत आहे . माणसांना किड्यामुंग्यांप्रमाणे मरण येत आहे . लोकप्रतिनिधींना सामान्यांशी घेणे देणे राहिलेले नसल्याने प्रशासनाने यावर तातडीने उपाय योजना केल्यास विकासाची गती साधताना निदान सर्वसामान्यांचे मुडदे पडणार नाहीत याची काळजी घ्यावी . जीवंतपणी प्रशासन कोणाची काळजी घेताना दिसत नाही . निदान मेल्यानंतर तरी प्रशासनाने अपघात टाळण्यासाठी एसी ऑफिसच्या बाहेर येऊन विचार करण्याची गरज आता व्यक्त होत आहे . **-'दैनिक वास्तव'ची भूमिका**



## दिव्यांग योजनेचा लाभ; मोहाडीच्या सोमनाथ चोंधे यांना स्कूटर प्रदान

### ➤ कन्नड पंचायत समितीत कार्यक्रम; गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत यांच्या हस्ते वितरण

➤ कन्नड / प्रतिनिधी :

राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग योजनेअंतर्गत कन्नड तालुक्यातील लाभार्थ्यांना विविध साधनांचे वाटप करण्यात आले . या योजनेमुळे दिव्यांग बांधवांच्या दैनंदिन जीवनात सुलभता निर्माण होत असून त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यास मदत होत आहे .

कन्नड पंचायत समिती कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत यांच्या हस्ते मोहाडी ( ता . कन्नड ) येथील सोमनाथ पूंजाबा चोंधे यांना स्कूटरची चावी देऊन सन्मानित करण्यात आले . या स्कूटरमुळे त्यांच्या दैनंदिन हालचाली अधिक सुलभ होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली .



या प्रसंगी सहायक गटविकास अधिकारी विजयकुमार पंडित, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, अध्यक्ष योगेश घाटबळे, सचिव साईनाथ जाधव, ग्रामपंचायत अधिकारी अशोक काळे, उत्तम गिरी, पोपट जंजाळ, ज्ञानेश्वर पवार आदी मान्यवर उपस्थित होते .
कार्यक्रमात उपस्थितांनी शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करत दिव्यांग बांधवांसाठी अशा योजनांची गरज अधोरेखित केली .

## रमजान ईद निमित्ताने छत्रपती स. साखर कारखान्याचे व्हा चेअरमन मोहनदादा जगताप यांची भेट



➤ माजलगाव : शहरातील फुले नगर येथील रहिवासी चांदभाई यांच्या निवासस्थानी रमजान ईद निमित्ताने छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्ह चेअरमन मोहनदादा जगताप , संतोष नायबळ, शरद यादव ,प्रताप रांजवण, नगरसेवक भारत होके ,भागवत भोसले ,विजय जगताप अशोक होके सर ,टी आर जावळे ,संतोष भाऊ आदींनी भेट दिली

## माजलगाव तालुक्यात हॉटेलवर धाडी; घरगुती गॅस सिलेंडर जप्त

### पुरवठा निरीक्षक प्राची ठाकूर यांच्या पथकाची कारवाई; नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर माजलगाव तालुक्यात प्रशासनाने बेकायदेशीर गॅस वापराविरोधात धडक मोहीम राबवत बुधवारी ( ता . १८ ) सायंकाळी विविध ठिकाणी हॉटेलवर धाडी टाकल्या . या कारवाईत तालखेड फाटा, सावरगाव फाटा आणि परभणी फाटा परिसरातील चार हॉटेलमधून घरगुती वापरासाठी असलेले लाल रंगाचे गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले .

ही कारवाई पुरवठा निरीक्षक प्राची प्रताप ठाकूर यांच्या पथकाने तहसीलदार संतोष रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली . पुरवठा सहायक राम पवार व इतर कर्मचाऱ्यांचा या पथकात समावेश होता .

सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर इराण–इस्त्रायल संघर्षामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होऊन गॅस टंचाई निर्माण झाली आहे . या पार्श्वभूमीवर शासनाने घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर रोखण्यासाठी कडक निर्बंध लागू केले आहेत . जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विशेष पथके स्थापन करून अशा गैरवापरावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत . दरम्यान, तपासणीदरम्यान संबंधित हॉटेल व्यावसायिकांकडून अनुदानित घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यावसायिक कारणांसाठी होत असल्याचे आढळून आले . नियमांचे उल्लंघन केल्याने पथकाने तात्काळ कारवाई करत सिलेंडर जप्त केले तसेच संबंधितांवर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे .

याबाबत बोलताना पुरवठा निरीक्षक प्राची ठाकूर यांनी सांगितले की, "घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर हा नियमभंग असून अशा प्रकारांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे . तालुक्यातील सर्व हॉटेल व खाद्यपदार्थ व्यवसायांची नियमित तपासणी केली जाईल . नागरिकांनी घरगुती गॅसचा गैरवापर टाळावा," असे आवाहन त्यांनी केले .

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- तालखेड, सावरगाव व परभणी फाटा परिसरातील हॉटेलवर धाडी
- घरगुती ( अनुदानित ) गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर उघड
- अनेक सिलेंडर जप्त ; संबंधितांवर कायदेशीर कारवाई
- इंधन टंचाईमुळे प्रशासनाचे विशेष पथक सक्रिय
- पुढेही तपासणी व कारवाई सुरू राहणार
- माजलगाव तालुक्यात इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक गैरवापर रोखण्यासाठी प्रशासनाची धडक कारवाई .



माजलगाव तालुक्यातील तालखेड, सावरगाव व परभणी फाटा परिसरातील हॉटेलवर पुरवठा विभागाच्या पथकाने टाकलेल्या धाडीत जप्त करण्यात आलेले घरगुती गॅस सिलेंडर समवेत कर्तव्यदक्ष तहसीलदार संतोष रुईकर , पुरवठा निरीक्षक , प्राची ठाकूर , पुरवठा सहाय्यक , राम पवार

## सांगवी पाटण येथे रमजान ईदनिमित्त सर्वधर्मसमभावाचा आदर्श

➤ आष्टी / प्रतिनिधी :

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे रमजान ईदच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य व भाईचाऱ्याचा आदर्शवत संदेश देणारा कार्यक्रम उत्साहात पार पडला . येथील शिवरायांचा मुस्लिम समीर बादशहा शेख यांच्या निवासस्थानी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ईद साजरी करण्यात आली .

या प्रसंगी आ . सुरेश धस भागवताचार्य ह .भ .प . काशिनाथ महाराज शास्त्री, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार, प्राचार्य एच . जी . विधाते, युवा नेते अमोल तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, माऊली भोसले, राजू भोसले, पत्रकार नितीन कांबळे, संतोष ससाणे, ग्रामविस्तार अधिकारी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .



सर्वांनी एकमेकांना गळाभेट देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या . या कार्यक्रमातून सांगवी पाटण गावात जपली जाणारी भाईचारा आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली .विशेष म्हणजे, सांगवी पाटण येथील ग्रामस्थ रमजान ईद, दीपावली, दसरा, यात्रा, पोळा यांसारखे सर्व सण एकत्रितपणे साजरे करतात . त्यामुळे गावात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ होत आहे ."आपण कोणत्या जाती–धर्मात



जन्माला येतो हे आपल्या हातात नसते, मात्र सर्व जाती–धर्मांचा आदर करणे हे आपल्या हातात असते," हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला .
सांगवी पाटणची ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, आजच्या काळात अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले .

**निवड** ➤ अध्यक्षपदी बापू किरवले, उपाध्यक्षपदी राम हनुमंत माने तर सचिव पदी रफिक पठाण

## सिरसाळ्यात 'स्वाभिमानी पत्रकार संघाची' नूतन कार्यकारिणी जाहीर

➤ सिरसाळा/प्रतिनिधी :

येथे 'स्वाभिमानी पत्रकार संघाची' नूतन कार्यकारिणी नुकतीच उत्साहात जाहीर करण्यात आली . या निवडीमध्ये अध्यक्षपदी बापू किरवले, उपाध्यक्षपदी राम माणे, सचिव पदी रफिक पठाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे . नूतन पदाधिकारी व कार्यकारिणी पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि



पत्रकारांच्या न्याय्य हक्कासाठी ही संघटना कार्यरत राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले .
अतुल बडे, देविदास वाघमारे, केशव सटाले, महारुद्र कदम, गोरख काळे आणि नितीन काळे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे .
कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा आणि सदस्यांचा विशेष सत्कार करण्यात आला . यावेळी मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ते परळी मतदारसंघाचे सदस्य बाबासाहेब अण्णा काळे, गहिनीनाथ काळे आणि राम काळे यांची प्रमुख उपस्थिती होती .
यावेळी राष्ट्रवादीचे युवक नेते अक्षय दळवी आणि अमोल वाघमारे यांनीही उपस्थित राहून नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या . "लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांनी समाजहितासाठी एकजुटीने काम करावे," अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या . या निवडीबद्दल परिसरातून नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .